Title of Programme: **'माझी मराठी स्वाक्षरी' उपक्रम**

Name of Organizing Department: **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : १६ /१/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,राजगुरुनगर**

Target Group: **महाविद्यालयातील सर्व शाखांचे विद्यार्थी,**

Number of Participants: ३४०

Name of Resource Person: संस्थाध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब

Total Expenditure for the Programme: ७००/-

Source of Funding: - **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,राजगुरुनगर**

**Report: 'माझी मराठी स्वाक्षरी' उपक्रम**

दि. १६/१/२०२६ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून 'माझी मराठी स्वाक्षरी' हा अभिनव उपक्रम राबविला. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, नगरसेवक दिनेश सांडभोर, स्नेहल राक्षे, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, मच्छिंद्र राक्षे, प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते. उपस्थितांनी मराठी स्वाक्षरी करून आपले माय मराठीबद्दलचे प्रेम, आदरभाव व्यक्त केला. महाविद्यालयातील दर्शनी भागात मांडणी केलेल्या फलकावर विद्यार्थ्यांनी कल्पक सृजनातून आपापल्या मराठी स्वाक्षरी साकारल्या. महाविद्यालयातील सर्वच विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला.

या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष मा. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, की मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि मराठी अस्मितेच्या जतनासाठी मराठी स्वाक्षरी हा एक महत्त्वाचा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम आहे.मराठी भाषेचा अभिमान मनात बाळगून सर्वांनी आपल्या मातृभाषेतून स्वाक्षरी करावी, असे आवाहन त्यांनी केले. ह्या उपक्रमाचे आयोजन मराठी विभाग

HRM

प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. पार्थ खाडीलकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.




नगरसेविका मा. स्नेहल राक्षे यांचे स्वागत




'माझी मराठी स्वाक्षरी' या उपक्रमात सहभागी मान्यवर




हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक विजेती विद्यार्थिनीला पारितोषिक देताना नगरसेवक दिनेश सांडभोर

लोकमत

# राजगुरू महाविद्यालयात 'माझी मराठी स्वाक्षरी' उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून 'माझी मराठी स्वाक्षरी' हा अभिनव उपक्रम राबविला.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, नगरसेवक दिनेश सांडभोर, सौ. स्नेहल राक्षे, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, मच्छिंद्र राक्षे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते. उपस्थितांनी मराठी स्वाक्षरी करून आपल्या माय मराठीबद्दलचे प्रेम आणि आदरभाव व्यक्त केला. महाविद्यालयातील दर्शनी भागात मांडणी केलेल्या फलकावर विद्यार्थ्यांनी कल्पक सर्जनातून आपापल्या मराठी स्वाक्षऱ्या साकारल्या. महाविद्यालयातील सर्वच विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा पुस्तक व अभिजात मराठी कवितेची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला**

याप्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि मराठी अस्मितेच्या जतनासाठी मराठी स्वाक्षरी हा एक महत्त्वाचा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम आहे.

मराठी भाषेचा अभिमान मनात बाळगून सर्वांनी आपल्या मातृभाषेतून स्वाक्षरी करावी, असे आवाहन त्यांनी केले. साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिदिनानिमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक प्रार्थना यादव, द्वितीय क्रमांक दुर्गा सातपुते, तृतीय क्रमांक साक्षी उखंडे यांचा आला, तर कनिष्ठ गटात आदिती गाढवे, आदिती वरकड, करण मानकर, श्रावणी मांजरे आणि अनुष्का नाईकडे यांना गुणानुक्रमे क्रमांक मिळाला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुस्तक व अभिजात मराठी कवितेची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 20, 2026
Powered by: erelego.com

सकाळ



राजगुरुनगर (ता. खेड) : हस्ताक्षर स्पर्धेतील विजेते विद्यार्थी व मान्यवर.

# राजगुरू महाविद्यालयात 'माझी मराठी स्वाक्षरी'

राजगुरुनगर, ता. १७ : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून 'माझी मराठी स्वाक्षरी' हा अभिनव उपक्रम शुक्रवारी राबविला.

महाविद्यालयातील दर्शनीय फलकावर विद्यार्थ्यांनी आपापल्या मराठी स्वाक्षरी करून आपले मराठीबद्दलचे प्रेम, आदरभाव व्यक्त केला. महाविद्यालयातील सर्वच विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक नारायण शिंदे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि मराठी अस्मितेच्या जतनासाठी मराठी स्वाक्षरी हा एक महत्त्वाचा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम आहे.

तसेच यावेळी साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीदिनानिमित्त घेतलेल्या हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. या स्पर्धेत वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक प्रार्थना यादव, द्वितीय क्रमांक दुर्गा सातपुते, तृतीय क्रमांक साक्षी उखंडे यांचा आला. तर कनिष्ठ गटात आदिती गाढवे, आदिती वरकड, करण मानकर, श्रावणी मांजरे आणि अनुष्का नाईकडे यांचा गुणानुक्रमे क्रमांक आला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुस्तक व अभिजात मराठी कवितेची प्रतिमा देऊन गौरव केला. या उपक्रमाचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. पार्थ खाडीलकर यांनी केले.

Pune, District-Today
18/01/2026 Page No. 4

ePaper
नवराष्ट्र Pune | 20 January 2026 | Page 3 | navarashtra.com

# ‘माझी मराठी स्वाक्षरी’स प्रतिसाद

## राजगुरु महाविद्यालयात अभिनव व प्रेरणादायी उपक्रम उत्साहात

▶ राजगुरुनगर (वा.) मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने ‘माझी मराठी स्वाक्षरी’ हा अभिनव व प्रेरणादायी उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान, प्रेम व जिव्हाळा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमास खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, नगरसेवक दिनेश सांडभोर व स्नेहल राक्षे, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांनी मराठीत स्वाक्षरी करून आपल्या मायमराठीबद्दलचा अभिमान आणि आदरभाव व्यक्त केला. महाविद्यालयाच्या दर्शनी भागात आकर्षक मांडणी केलेल्या फलकावर विद्यार्थ्यांनी कल्पकतेने आपापल्या मराठी स्वाक्षऱ्या साकारल्या. कला, वाणिज्य व विज्ञान अशा सर्व विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या उपक्रमाचे आयोजन मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे व प्रा. पार्थ खाडीलकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. संजय शिंदे यांनी मानले.



### ‘मराठी स्वाक्षरी’ सांस्कृतिक उपक्रम

यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, “मराठी भाषेचे संवर्धन आणि अस्मितेचे जतन करण्यासाठी ‘मराठी स्वाक्षरी’ हा एक प्रभावी सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम आहे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात मराठीचा अभिमान बाळगून मातृभाषेत स्वाक्षरी करण्याची सवय लावावी,” असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीदिनानिमित्त आयोजित हस्ताक्षर स्पर्धेचे बक्षीस वितरणही यावेळी करण्यात आले. वरिष्ठ गटात प्रार्थना यादव हिने प्रथम, दुर्गा सातपुते हिने द्वितीय, तर साक्षी उखंडे हिने तृतीय क्रमांक पटकावला. कनिष्ठ गटात आदिती गाढवे, आदिती वरकड, करण मानकर, श्रावणी मांजरे व अनुष्का नाईकडे यांनी अनुक्रमे क्रमांक मिळवले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुस्तक व अभिजात मराठी कवितेची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला.

# राजगुरू महाविद्यालयात 'माझी मराठी स्वाक्षरी' उपक्रम




राजगुरुनगर : येथे 'माझी मराठी स्वाक्षरी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून 'माझी मराठी स्वाक्षरी' हा अभिनव उपक्रम राबविला. या वेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, नगरसेवक दिनेश सांडभोर व स्नेहल राक्षे, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

उपस्थितांनी मराठी स्वाक्षरी करून आपले माय मराठीबद्दलचे प्रेम, आदरभाव व्यक्त केला. महाविद्यालयातील दर्शनी भागात मांडणी केलेल्या फलकावर विद्यार्थ्यांनी कल्पक सृजनातून आपापल्या मराठी स्वाक्षरी साकारल्या. महाविद्यालयातील सर्वच विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला. या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. बुट्टे पाटील म्हणाले की, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि अस्मितेच्या जतनासाठी मराठी स्वाक्षरी हा एक महत्त्वाचा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम आहे.

मराठी भाषेचा अभिमान मनात बाळगून सर्वांनी आपल्या मातृभाषेतून स्वाक्षरी करावी, असे आवाहन त्यांनी केले. साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीदिनानिमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक प्रार्थना यादव, द्वितीय क्रमांक दुर्गा सातपुते, तृतीय क्रमांक साक्षी उखंडे यांचा आला. तर, कनिष्ठ गटात आदिती गाढवे, आदिती वरकड, करण मानकर, श्रावणी मांजरे आणि अनुष्का नाईकडे यांचा गुणानुक्रमे क्रमांक आला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुस्तक व अभिजात मराठी कवितेची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. पार्थ खाडीलकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी, तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

# मराठी में हस्ताक्षर कर विद्यार्थियों ने जताया मराठी प्रेम

भास्कर न्यूज़ | राजगुरुनगर




हुतात्मा राजगुरु महाविद्यालय के मराठी विभाग द्वारा मराठी भाषा संवर्धन पखवाड़े का आयोजन किया गया। विद्यार्थियों ने 'मेरे मराठी हस्ताक्षर' नामक अभिनव अभियान चलाया गया। उपस्थित अतिथियों ने मराठी में हस्ताक्षर कर अपनी मातृभाषा के प्रति प्रेम और सम्मान व्यक्त किया। महाविद्यालय के मुख्य द्वार पर लगाए गए फलक पर विद्यार्थियों ने अपनी रचनात्मकता से मराठी में हस्ताक्षर किए। इस उपक्रम में महाविद्यालय की सभी शाखाओं के विद्यार्थियों ने उत्साहपूर्वक भाग लिया। खेड़ तहसील शिक्षण प्रसारक मंडल के अध्यक्ष एड. देवेंद्र बुट्टे पाटिल, उपाध्यक्ष नानासाहब टाकलकर, नगरसेवक दिनेश सांडभोर व स्नेहल राक्षे, संचालक बालासाहब सांडभोर, हीरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगले और उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित थे।

## मराठी अस्मिता की रक्षा के लिए सांस्कृतिक पहल

इस अवसर पर संस्थाध्यक्ष एड. बुट्टे पाटील ने कहा कि मराठी भाषा के संवर्धन और मराठी अस्मिता की रक्षा के लिए मराठी हस्ताक्षर एक महत्वपूर्ण सामाजिक और सांस्कृतिक पहल है। उन्होंने सभी से अपनी मातृभाषा में हस्ताक्षर करने का आह्वान किया।

## प्रतियोगिताओं के विजेताओं को पुरस्कार

साहबराव बुट्टे-पाटिल स्मृति दिवस के उपलक्ष्य में आयोजित हस्ताक्षर प्रतियोगिता के विजेताओं को भी इस अवसर पर सम्मानित किया गया। वरिष्ठ वर्ग में प्रार्थना यादव (प्रथम), दुर्गा सातपुते (द्वितीय) और साक्षी उखंडे (तृतीय) ने बाजी मारी। वहीं कनिष्ठ वर्ग में आदिती गाढवे, आदिती वरकड, करण मानकर, श्रावणी मांजरे और अनुष्का नाईकड़े ने क्रमशः स्थान प्राप्त किया। इन मेधावी विद्यार्थियों को पुस्तक और प्रसिद्ध मराठी कविता की प्रतिमा भेंट कर सम्मानित किया गया। कार्यक्रम का संचालन डॉ. बालासाहब अनुसे ने किया और आभार प्रदर्शन डॉ. संजय शिंदे ने माना।

दैनिक भास्कर
Mon, 19 January 2026
https://epaper.bhaskarhindi.com/c/78971610

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.